काव्यप्रकार - शेलकाव्य
काव्य - स्वरचित अंत्याक्षरी

# शीर्षक:- पाऊस

आल्या पावसाच्या सरी
सरी येतात दारात,
आले अंगणात पाणी
पाणी साचले घरात ...१

पाण्यामध्ये सोडू नाव
नाव तिचे जलधारा,
कागदाची होडी छान
छान वाहे मृगधारा ...2

पावसाचे मोठे थेंब
थेंब जोरात पडती,
लता, वेली, पाने, वृक्ष
वृक्ष भिजूनिया जाती ...3

ऊन कुवडसे आले
आले भुईवरी मोर,
इंद्रधनु सप्तरंग
सप्तरंग मनोहर ...४

© ® कवयित्री /लेखिका
काव्यरसिका
सौ. रसिका आनंद शालिग्राम
पुणे.

